ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १८ नोव्हेंबर, १९५९ अंक ४२

## विविध माहिती

**मदुरा शहरासाठीं दुधाचा पुरवठा**—मदुरा शहराला निर्जंतुक शुद्ध दुधाचा पुरवठा करण्याची योजना मद्रास सरकारनें तयार केली असून ती मध्यवर्ती सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आली आहे. ह्या योजनेप्रमाणें मदुरा शहरांत रोज ५०,००० पौंड शुद्ध दूध बाटल्यांतून भरण्यासाठी यंत्रसामग्री बसविण्यांत येईल. त्याशिवाय दुधाच्या भुकटीपासून दूध तयार करण्याची सोयहि ह्या गौळवाड्यांत करण्यांत येईल.

**उकाई धरणाची पायाभरणी**—खानदेशांतील उकाई धरणाच्या पायाभरणीचा समारंभ लवकरच होणार आहे. तापी नदीवर वीज निर्माण करण्याच्या योजनेचा एक भाग, म्हणजेच उकाई धरण होय. सर्व योजनेला ६३ कोटी रु. खर्च येईल. उकाई धरणाखाली ८ लाख एकर जमीन भिजेल व त्यामुळें तापीच्या पुराला थोडाबहुत आळाहि बसेल.

**वर्णीय पक्षपाताचा परिणाम**—केपटाऊन येथील एका गोऱ्या जोडप्यानें एका निराधार मुलाला पाळलें होतें. त्या मुलाला घरांत न ठेवण्याबद्दल नंतर गृहखात्यानें हुकूम काढला होता. पण गोऱ्या जोडप्यानें द. आफ्रिका सोडल्यास त्याला मुलाला ठेवून घेतां येईल असें आतां फर्मावण्यांत आलें आहे. मुलाच्या खऱ्या आईबापांचा पत्ता नाहीं.

**बरौनी येथील तेलाचा कारखाना**—बिहारमध्यें काढण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्याची जागा आतां निश्चित करण्यांत आली आहे. गेल्या जुलैमध्यें ह्या जागेची पाहणी रशिअन तज्ज्ञांनीं दोनदां केली होती. इंडिअन रिफायनरीज लि. ह्या कंपनीचे कांहीं अधिकारी लवकरच कारखान्याच्या उभारणीची प्राथमिक तयारी करण्यासाठी जाणार आहेत.

**तागाच्या गिरण्यांची परिस्थिति**—गेल्या तीन वर्षांत पश्चिम बंगालमधील १२ तागाच्या गिरण्या बंद पडल्या. त्याचप्रमाणें गिरण्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्याहि कमी झाली. १९५१ सालीं गिरण्यांतून २·८१ लाख मजूर काम करीत होते. ती संख्या आतां २·३० लाखापर्यंत खालीं आली आहे. तागाच्या गिरण्यांतील वेतनमान तौलनिकदृष्ट्या कमी आहे.

**स्वीडनच्या वकिलातीची इमारत**—दिल्ली येथील चाणक्यपुरींत स्वीडनच्या वकिलातीची नवीन इमारत बांधण्यांत आली आहे. दिल्लींत परदेशीय राजदूतांची वसाहत आतां झपाट्यानें वाढूं लागली आहे. स्वीडननें बांधलेल्या इमारतीसाठी १० एकर जागा मिळविण्यांत आली होती. इमारत आकर्षक असल्याचें मत पं. नेहरू ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

**खास कोर्टाचा निवाडा मान्य**—कलकत्ता ट्रॅम्वे कंपनी व तिचे कामगार ह्यांच्या दरम्यान उपस्थित झालेल्या तंट्याबाबत खास कोर्टानें दिलेला निवाडा ट्रॅम्वे कंपनीनें मान्य केला आहे. निवाड्याप्रमाणें कामगारांच्या मूळच्या पगारांत १ ऑक्टोबर १९५९ पासून ५ टक्के वाढ करण्यांत आली आहे. प्रत्येक कामगाराला दरमहा किमान ५ रु. पगारवाढ मिळालीच पाहिजे, अशी अट घालण्यांत आली आहे.

**प्रत्येक राज्यांत खताचा कारखाना**—प्रत्येक राज्यांत खताचा निदान एक कारखाना उभारण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. भारताला अद्याप कितीतरी खताच्या कारखान्यांची आवश्यकता आहे. पण परदेशांच्या मदतीशिवाय ते उभारणें सहजासहजीं शक्य होणार नाहीं, असें मत आंध्र राज्याच्या मुख्य मंत्र्यांनीं व्यक्त केलें आहे.

**रिटॅनिअम खनिजाचा आढळ**—निलगिरी पर्वतांत कांहीं ठिकाणीं रिटॅनिअम ह्या खनिजाचा शोध लागला आहे. कांहीं विशेष प्रकारचें पोलाद तयार करण्याच्या कामीं ह्या खनिजाचा उपयोग करण्यांत येतो. खनिजाच्या अशुद्ध मातींत रिटॅनिअमचें प्रमाण ४० टक्के आहे. निष्कलंक पोलाद तयार करण्यासाठी रिटॅनिअमचा महत्त्वाचा उपयोग होतो.

**पोलाद कामगारांचा संप**—अमेरिकेंतील पोलादाच्या कारखान्यांतील कामगारांचा ११६ दिवस चाललेला संप तात्पुरता स्थगित करण्यांत आला आहे. कामगार संघटनांनीं व कारखान्याच्या चालकांनीं वाटाघाटी चालू कराव्या, असा हुकूम अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानें दिला आहे. वाटाघाटी फिसकटल्यास कामगारांना संपावर जाण्याची मुभा आहे.

**औषधांच्या कायद्यांत दुरुस्ती**—खोटीं व बनावट औषधें तयार करणें व तीं विकणें ह्याबद्दलच्या गुन्ह्याबद्दल तुरुंगवासाची शिक्षा देण्याची सक्ती करणारी दुरुस्ती औषधांच्या कायद्यांत करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. त्याचप्रमाणें ह्या कायद्याची अंमलबजावणी सर्व राज्यांत सारखीच करण्याबद्दल सूचनाहि देण्यांत येणार आहेत.

**सिगारेटसाठीं लागणारा कागद**—सिगारेट तयार करण्यासाठीं लागणारा सर्व प्रकारचा कागद आयात करण्यासाठीं मोकळेपणानें परवाने देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. १९६२ च्या सप्टेंबर महिन्यापर्यंत सिगारेटच्या कागदासाठीं लागणाऱ्या कागदावर कोणत्याहि प्रकारचें संख्यात्मक बंधन घालण्यांत येणार नाहीं.

### दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. चा रौप्य-महोत्सव समारंभ

बुधवार, दि १८ नोव्हेंबर, १९५९ या दिवशीं दुपारीं ३-३० वाजतां वरील समारंभ आणि महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या पुतळ्याचें अनावरण होणार आहे. समारंभाचें अध्यक्ष-स्थान मुंबई राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं स्वीकारण्याचें मान्य केलें आहे.

---

### कॅनरा बँकिंग कॉर्पोरेशनच्या चेअरमनचा मृत्यु

कॅनरा बँकिंग कॉर्पोरेशन लि. चे चेअरमन, डॉ. यू. सुंदरराम पै, एम बी. बी. एस्., हे ३१ ऑक्टोबर, १९५९ रोजीं मरण पावले. १-१-१९३५ पासून ३१-१०-१९५९ अखेर ते बँकेचे चेअरमन होते.

---

### वाई अर्बन बँकेंतील समारंभ

दि वाई अर्बन को. बँक लि., नें नवीनच बांधलेलें बंदिस्त तळघर व त्यावरील गोडाऊन या इमारतीचें उद्घाटन नामदार श्री. बाळासाहेब भारदे, सहकारमंत्री, मुंबई राज्य, यांचे हस्तें रविवार ता. १।११।५९ रोजीं सायंकाळीं ७-३० वाजतां झालें.

### बँक तंटा ट्रायब्यूनलकडे सोपविला

नॅशनल ग्रिंडलेज बँक लि., दिल्ली आणि त्या बँकेचे नोकर, ह्यांचेमधील तंटा इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलकडे निवाड्यासाठी सोपविण्यांत आला आहे. बँकेनें आपल्या सहा नोकरांचे विरुद्ध शिस्तविषयक केलेली योजना समर्थनीय होती किंवा नाहीं; समर्थनीय नसल्यास त्या नोकरांची भरपाई कशी केली जावी; हा प्रश्न तंट्यामध्यें समाविष्ट आहे. नोकरांना आपलें म्हणणें मांडण्यास परवानगी न देतां, त्यांच्या गुप्त रेकॉर्डांत नोंदी करण्याचा बँकेला अधिकार होता का, ह्याहि प्रश्नाचा ट्रायब्यूनल निवाडा करील.

---

### सहकारी बँकांत प्रादेशिक भाषेचा वापर

हिंदी किंवा प्रादेशिक भाषांचा वापर सहकारी बँकांनीं आपले फॉर्म व हिशेब ह्यांसाठी करावा, असें रिझर्व्ह बँकेनें सुचविलें आहे. रूरल बँकिंग चौकशीकमिटीच्या शिफारसीला अनुसरून रिझर्व्ह बँकेनें ही सूचना केलेली आहे. बऱ्याच बँका आपल्या गिऱ्हाइकांच्या सोईसाठी असा बदल करण्यास तयार आहेत, असें रिझर्व्ह बँकेनें म्हटलें आहे. कांहीं बँकांनीं त्या दिशेनें प्रारंभहि केला आहे.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ | सारस्वत बँक गृह, मुंबई ४. | टेलिफोन : ७०१४

बँकेचे समासद आणि ठेवीदार यांच्या सोईसाठी

आमच्या वरळी, दादर आणि पुणें शाखांत माफक दरांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करण्यांत आली आहे.

सविस्तर माहिती शाखाधिकाऱ्यांकडे मिळेल.

शाखा : फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव मुंबई ४.



* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ ) | अध्यक्ष श्री. छोटालाल डी. जोशी | मुंबई शाखा:-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... | ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... | ... | रु. ५६,००,००० |

★ चालू खातें व्याज ½ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दरावाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १८ नोव्हेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तेलाचे नळ टाकण्याच्या योजनेला प्रारंभ

ऑइल इंडिआ प्रा. लिमिटेड ह्या कंपनीनें आसामच्या वरच्या भागांतील अशुद्ध तेल नळाच्या साह्यानें तेलशुद्धीच्या कारखान्यांना पुरविण्याचें काम अंगावर घेतलेलें आहे. कंपनीसाठी लागणारे तेलाचे नळ आतां ब्रिटनकडून येऊं लागले आहेत. कलकत्ता येथील बंदरांत नळांचा पहिला हप्ता नुकताच आला आहे. आसामच्या उत्तरेकडील भागांत सांपडणारें अशुद्ध तेल गोहाटी येथें उभारण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यास पुरविण्यासाठी २६० मैल लांबीचे तेलाचे नळ टाकण्यांत यावयाचे आहेत. एकूण ७२० मैल लांबीचे नळ टाकण्यांत येणार असून ह्या कामाचा हा पहिला टप्पा आहे. दुसऱ्या टप्प्यांत ४६० मैल लांबीचे नळ टाकण्यांत येणार असून त्यांच्या साह्यानें बिहारमधील बरौनी येथें उभारण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्याला अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्यांत येणार आहे. तेलाचे नळ घालण्याचें काम बरेंच गुंतागुंतीचें व वेळाचें आहे. नळांची व इतर सामानसुमानाची वाहतूक हा एक अवघड प्रश्न आहे. ह्या बाबतींत चांगला अनुभव असलेल्या बर्मा-शेल ह्या कंपनीकडे नळ घालण्याचें काम सोंपविण्यांत आलें आहे. नळ घालण्याचें काम पूर्ण झाल्यावर ऑइल इंडिआ प्रा. लि. ह्या कंपनीतर्फे गोहाटी येथील तेलशुद्धीच्या कारखान्याला दरसाल ७,५०,००० टन तेल पुरविण्यांत येईल. त्याचप्रमाणें बरौनी येथील कारखान्यालाहि दरसाल २० लाख टन अशुद्ध तेल पुरवितां येईल. ह्या दोन्ही कारखान्यांची मालकी सार्वजनिक राहणार आहे.

आसाम ऑईल कंपनीनें १९५३ च्या मध्याच्या सुमाराला प्रथम कांहीं विहिरी खोदल्या. तेव्हांपासून कंपनीनें ५८ तेलविहिरी खणल्या असून त्यांपैकी बहुतेक यशस्वी ठरल्या आहेत. सध्या करण्यांत आलेल्या अंदाजाप्रमाणें ह्या भागांत दरसाल २७,५०,००० टन तेल सांपडूं शकेल. भारतांत हल्लीं उत्पादन करण्यांत येणाऱ्या तेलाच्या पांच पट इतका हा साठा आहे. अजूनहि आसाममध्यें नवीन विहिरी खोदण्याचें काम चालू आहे आणि तेलाचे नळ घालण्याचें काम पुरें झाल्यावरहि तेलाच्या शोधाचें काम पुढें चालू ठेवण्यांत येणार आहे. ऑइल इंडिआ कंपनी एकूण ८१ कोटी रुपयांचें भांडवल गुंतविणार आहे; त्यांपैकी ५३ कोटी रुपयांचें भांडवल नळ योजनेच्या कामींच खर्च व्हावयाचें आहे. तेलाचे नळ घालण्याच्या कामासाठी भारतानें परदेशांकडून मिळालेलें कर्ज स्वीकारलेलें आहे. बर्माशेल कंपनी व ब्रिटिश सरकार ह्यांनीं भारताला २·३ कोटी पौंड कर्ज देऊं केलेलें आहे. त्यांपैकी ३० लाख पौंड ब्रिटिश सरकारनें देऊं केलेलें आहे. तें सर्व तेलाचे नळ व तदनुषंगिक इतर सामानसुमान ह्यांच्या खरेदीसाठी वापरण्यांत येणार आहे. तेलाचे नळ ज्या मार्गानें घालावयाचे त्या मार्गाची प्राथमिक पाहणी आतां पूर्ण झाली आहे. कलकत्ता येथें नळ येण्यास प्रारंभ झाला असून १९६० पर्यंत दरमहा ५,००० टन वजनाचे नळ भारतांत आणण्यांत येतील. हे सर्व नळ पहिल्या टप्प्यासाठी वापरले जातील. दुसऱ्या टप्प्यासाठी लागणारे नळ भारतांतच बनविण्यांत येतील अशी अपेक्षा आहे. रूरकेला येथील हिंदुस्थान स्टील कंपनी १९६० च्या सप्टेंबरच्या सुमारास उत्पादन करूं लागेल. अशा रीतीनें दुसऱ्या टप्प्यासाठी लागणारे तेलाचे नळ खुद्द भारतांतच तयार होतील.

---

## तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम आणि बचतीची जरुरी

गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सपुढें भाषण करतांना भारताच्या उप-अर्थमंत्री श्रीमती तारकेश्वरी सिन्हा ह्यांनीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं आपले विचार प्रकट केले. त्या म्हणाल्या कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ९,००० कोटी रुपये खर्च होणार आहेत. खाजगी मालकीच्या विभागासाठी कार्यक्रमांत ३,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येण्याचा संभव आहे. कार्यक्रम अमलांत आणण्यासाठी पैसा गोळा करावा लागेल. तो उभा करण्यासाठी शेतीच्या उत्पन्नावरील करांत वाढ करण्याचा एक मार्ग आहे. पण ह्या मार्गानें उभारावयाच्या पैशालाहि कांहीं मर्यादा पडणारच. कारण, शेतकऱ्यांवर जबर कर बसविण्यांत आले तर उत्पादन वाढविण्याची त्यांची प्रेरणाच नाश पावण्याचा संभव आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभापासून भारताला परदेशांच्या कर्जाची फेड करावी लागणार आहे. त्यामुळें सुमारें ५०० कोटी रुपयांची परदेशी मदत मिळविण्याची खटपट करावी लागेल. परदेशांकडून मिळूं शकणाऱ्या मदतीलाहि मर्यादा आहेतच. म्हणून स्वदेशांतच पैसा गोळा करावा लागेल. हा प्रश्न अधिक बिकट होण्याचा संभव आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत पुष्कळ राज्यसरकारांना पैसा गोळा करण्याच्या बाबतींत पुरेसें यश आलेलें नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या मार्गानेंहि पैसा उभारण्यास हरकत नाहीं. अद्याप नवीन करांचा तपशील ठरलेला नाहीं; तरी पण लोकांनीं अधिक कर देण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्याचबरोबर कार्यक्रमासाठी पैसा उभारावयाचा असेल तर लोकांनीं आपली बचत करण्याची शक्ति १५ ते २० टक्क्यांनीं वाढविली पाहिजे.

---

## "आझाद काश्मीर—पाकिस्तानचा एक कोपरा"

"दि न्यूयॉर्क टाइम्स" हें अमेरिकेचें प्रातिनिधिक वृत्तपत्र 'आझाद काश्मीर'ला 'आझाद काश्मीर ह्या नांवानें ओळखला जाणारा पाकिस्तानचा एक कोपरा' असें म्हणूं लागलें आहे. काश्मीरचे दोन्ही भाग 'व्यापपण्यांत' आले आहेत; पाकिस्तानच स्वयंनिर्णय मागत आहे, असेंहि त्या वृत्तपत्राचें म्हणणें असतें. काश्मीरची बाब सोडली, तर इतर बाबतींत 'न्यूयॉर्क टाइम्स' भारताकडे समजूतदारपणें पहातें.

---

## राष्ट्रीय व दरमाणशीं उत्पन्न

### योजनेंतील लक्ष्य गांठण्याची शक्यता दिसत नाहीं

१९५८–५९ सालविषयक राष्ट्रीय उत्पन्नाचे आंकडे सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशननें प्रसिद्ध केले आहेत, त्यावरून गेल्यावर्षी झालेली पुरवठ्यांतील वाढ डोळ्यांत भरण्याजोगी आहे. शेतीच्या उत्पादनानें त्यात विशेष हातभार लावलेला आहे. त्यांत १९५७–५८ चे मानानें १३·२% वाढ झाली आहे. वाहतूक ८·७% वाढ, बँकिंग व विमा ६·६% वाढ, अशीं वाढीचीं इतर प्रमाणें आहेत. कारखानदारीची प्रगति असमाधानकारक (१·१%) आहे; कपास कापडाच्या गिरण्यांनीं केलेली पीछेहाट त्याला कारणीभूत आहे. सरकारी मालकीच्या कोळशाखाणींचें उत्पादन न सुधारल्यामुळें खाणी हें शीर्षकहि समाधानकारक प्रगति दाखवीत नाहीं. खालील तक्ता पहा :—

| विभाग | एकूण उत्पादनांतील हिस्सा (%) १९५७–५८ | १९५७–५८ च्या मानानें १९५८–५९ मधील % बदल | १९५७–५८ च्या मानानें १९५८–५९ मधील % एकूण उत्पादनांतील बदल |
|---|---|---|---|
| शेती | ३७·७ | + १३·२ | + ४·९८ |
| खाणी | ०·८ | + १·१ | + ०·०१ |
| कारखाने | ७·९ | + १·१ | + ०·०१ |
| वाहतूक | ०·४ | + ८·७ | + ०·०३ |
| रेल्वेज | २·५ | + २·६ | + ०·०७ |
| बँकिंग व विमा | ०·८ | + ६·६ | + ०·०५ |
| इतर व्यापार | १५·६ | + ४·३ | + ०·६७ |
| इतर विभाग | ३४·८ | + २·६ | + ०·८९ |
| सर्व विभागांची बेरीज | १००·० | + ६·८ | + ६·८० |

१९४८–४९ ते १९५८–५९ ह्या मुदतींत एकूण राष्ट्रीय उत्पन्न व दरमाणशीं उत्पन्न कसें वाढत गेलें, हें खालील तक्त्यांत दाखविलें आहे. गेल्या वर्षी दरमाणशीं उत्पन्न जितकें वाढलें, तितकें ह्यापूर्वी कधींच वाढलें नव्हतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नाची प्रत्यक्ष वाढ १०·४% झाली; पांच वर्षांत ती २५% व्हायला हवी, असें लक्ष्य ठेवण्यांत आलेलें आहे. तेव्हां, हें लक्ष्य गांठतां येईल, असें वाटत नाहीं. दरमाणशीं उत्पन्न (रु. २९०·७) हें १९५५–५६ चे मानानें फक्त ६·२% जास्त आहे.

| वर्ष | राष्ट्रीय उत्पन्न | दर माणशीं उत्पन्न |
|---|---|---|
| | (१९४८–४९ च्या किंमती लक्षांत घेऊन) | |
| | (कोटी रु.) | (रुपये) |
| १९४८–४९ | ८,६५० | २४६·९ |
| १९४९–५० | ८,८२० | २४८·६ |
| १९५०–५१ | ८,८५० | २४६·३ |
| १९५१–५२ | ९,१०० | २५०·१ |
| १९५२–५३ | ९,४६० | २५६·६ |
| १९५३–५४ | १०,०३० | २५८·७ |
| १९५४–५५ | १०,२८० | २७१·९ |
| १९५५–५६ | १०,४८० | २७३·६ |
| १९५६–५७ | ११,००० | २८३·५ |
| १९५७–५८ | १०,८३० | २७५·६ |
| १९५८–५९ | ११,५७० | २९०·७ |

## फर्मशीं विवाह करील, तीच आदर्श वधू

अमेरिकेंतील फर्म्समधील जागा भरतांना, उमेदवारांच्या पत्नींचे गुण लक्षांत घेतले जातात. ह्या परीक्षेला "वाइफ इन्स्पेक्शन" असें म्हणतात. उमेदवाराच्या पत्नीमध्यें खालील गुण अपेक्षिले जातात. तिला पूर्वीच्या उद्योग-व्यापारातला अनुभव असावा. प्रायव्हेट सेक्रेटरीचें काम तिनें केलेलें असावें. तिनें कॉलेजांत जाऊन शिक्षण घेतलेलें असेल तर उत्तम. इतर स्त्रियांत मिसळण्याचें तिला जमलें पाहिजे. घरांतील वातावरण आनंदी असावें; पतीच्या आवडींशीं ती समरस झालेली असावी. पतीला घरांत आराम वाटेल असें वातावरण हवें. पतीबरोबर प्रवास करण्याची तिची तयारी हवी; लोकांच्या गरजा आणि विक्रीच्या नव्या पद्धति ह्यांचेशीं तिनें परिचय राखला पाहिजे. सामाजिक जीवनांत तिनें अप्रतिम तारतम्य राखायला हवें. पतीच्या विचारसरणीच्या प्रगतीबरोबर तिनेंहि वाटचाल केली पाहिजे, पण त्याला जास्त पगार मिळावा ह्यासाठीं तिनें घुसपुस करतां कामा नये. तिनें मद्य घेऊं नये; पतीच्या सेक्रेटरींविषयीं किंवा व्यवसायांतील मित्र-मैत्रिणींविषयीं तिनें मत्सर दाखवूं नये. तिनें आपल्या पतीचें प्रतिनिधित्व केलें पाहिजे. पतीच्या कामधंद्याच्या वेळेला आपलें कौटुंबिक जीवन जुळवून घेऊन आखलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे, आदर्श वधू फर्मशीं विवाह करते; केवळ तिच्या पतीशीं नव्हे !

---

## एप्रिल–जून १९५९ मध्यें २३४ नव्या कंपन्यांची नोंद

चालू वर्षांच्या एप्रिल–जून १९५९ मध्यें एकूण ३४·०८ कोटी रुपये अधिकृत भांडवलाच्या २३४ नव्या कंपन्यांची नोंद झाली. यांपैकीं २२० खाजगी व १४ सार्वजनिक कंपन्या होत्या व त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें ३१·३७ व २·७२ कोटी रुपये होतें. जानेवारी–मार्च ५९ या काळांत २०६ कंपन्यांची नोंद झाली होती. पश्चिम विभागांत नोंद झालेल्या ७० कंपन्यांपैकी ६५ कंपन्या मुंबई राज्यांतील आहेत. त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें १९·६३ व १९·२३ कोटी रुपये आहे. या काळांत तीन मोठ्या म्हणजे १ कोटी रुपयांहून अधिक अधिकृत भांडवल असलेल्या ३ कंपन्यांची नोंद झाली. यांपैकीं २ सरकारी कंपन्या असून त्यांचें अधिकृत भांडवल १७ कोटी रुपयांचें आहे.

---

## आंतरराष्ट्रीय नाणेंनिधीचा आपला वांटा भारतानें पुरा केला

आंतरराष्ट्रीय नाणेंनिधींतील आपल्या वाढविलेल्या वांट्यांतील ५ कोटी डॉलर्स किंमतीचें सोनें भारत सरकारनें १२ ऑक्टोबर १९५९ रोजीं रिझर्व्ह बँकेच्या हवालीं केलें. या नाणेंनिधीनें असें सोनें ठेवून घेण्याकरितां अधिकृत मान्यता दिलेल्या बँकांत रिझर्व्ह बँकेची गणना होते. वाढीव वांट्यापैकीं उरलेला भाग १५ कोटी डॉलर्स किंमतीचा होता व तो रुपयांत द्यावयाचा होता. या वांट्याचाहि भरणा म्हणून भारत सरकारनें विनिमयसाध्य नसलेले बिनव्याजी रोखे दिले आहेत. या दोन्ही भरण्यांमुळें भारताचा या निधींतील वांटा ६० कोटी डॉलर्स झाला आहे.

## " विम्याचे प्रश्न तपासून ते सोपे करा "

### मद्रास हायकोर्टाची ला. इ. कॉर्पोरेशनला सूचना

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ज्या प्रश्नांचीं उत्तरें विमेच्छूंकडून लिहून घेते, त्या प्रश्नमालेची तज्ज्ञांकडून तपासणी करून घेण्यांत यावी आणि ते प्रश्न सोपे, निरक्षर विमेदारांनाहि समजतील असे केले जावेत, असें मद्रास हायकोर्टानें सुचविलें आहे. ऑल-इंडिया जनरल इन्शुअरन्स कंपनीकडे एका विधवेनें केलेल्या क्लेमच्या बाबतींत हा प्रश्न उपस्थित झाला. विधवेच्या पतीनें जानेवारी १९४८ मध्यें आपला आयुर्विमा उतरला, पण त्याला जून १९४८ मध्यें मृत्यु आला. मद्रासच्या सिटी सिव्हिल कोर्टानें विधवा बाईचा क्लेम नामंजूर केला, पण अपिलांत हायकोर्टानें तो मंजूर केला. लेटर्स पेटंट अपिलांत कंपनीचें म्हणणें ग्राह्य ठरविण्यांत येऊन क्लेम नामंजूर करण्यांत आला. मृत विमेदारानें विमा उतरतांना आपल्या प्रकृतीबद्दल योग्य कल्पना दिली नव्हती, असें कंपनीचें म्हणणें होतें. " चारचौघांचे संगतीत मी कधीं कधीं दारू पितों " असें विमेदारानें म्हटलें होतें, पण तें बुद्धिपुरस्सर केलेलें खोटें विधान असल्याचें हायकोर्टास आढळून आलें. " मृत विमेदार नेहेमींच खूप दारू पीत होता आणि मृत्यूचे वेळीं त्याला ' सायरॉसिस ऑफ दि लिव्हर ' रोग झालेला होता. त्यानें मद्यप्राशनाची माहिती दिली असती, खोटीं विधानें केलीं नसतीं, तर कोणत्याच व्यवहारनिपुण कंपनीनें त्याचा विमा स्वीकारला नसता; निदान प्रस्तुत विम्याप्रमाणें नेहेमींच्या दरानें तरी तो खास पत्करला नसता." असा न्यायमूर्तिद्वयांनीं अभिप्राय व्यक्त करून विमेदाराच्या विधवा पत्नीचा क्लेम अमान्य केला.

---

### ब्रिटनची आर्थिक स्थिति मजबूत आहे

ब्रिटनचे मुंबई येथील व्यापारी प्रतिनिधि मि. बेलिस ह्यांनीं ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेच्या मजबुतीबद्दल ग्वाही दिली आहे. इंडियन कौन्सिल फॉर वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेपुढें प्रस्तुत विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, ब्रिटनची अर्थव्यवस्था संपूर्णतया निरोगी आहे. खुद्द ब्रिटनमध्यें भरभराट नांदत आहे. कारण अंतर्गत चलनवृद्धीवर नियंत्रण ठेवण्यांत सरकारला यश मिळालें आहे. परदेशीय व्यापारांत ब्रिटन आयातीपेक्षा निर्यात अधिक करीत असल्यानें ब्रिटनजवळ परदेशीय नाणेंनिधिहि चांगला आहे. औद्योगिक उत्पादनांत वाढ होण्यास सुरुवात झाली असून मूलभूत स्वरूपाच्या धंद्यांचा विस्तार चांगला होत आहे. ब्रिटनमधील सामान्य माणसांत चालणारीं संभाषणें ऐकलीं अथवा त्यांच्या पैसे खर्च करण्याच्या सवयींकडे लक्ष दिलें तर ह्या भरभराटीची चांगली कल्पना येते. तथापि सर्वच परिस्थिति अगदीं उत्तम आहे असें नाहीं. योग्य ती दक्षता घेतली नाहीं तर चलनवृद्धीचें दडपण पुन्हां येण्याचा धोका आहेच. अधिक वेतनाच्या मागण्या व कच्च्या मालाच्या किंमती चढण्याची शक्यता, ह्या दोन गोष्टींकडे लक्ष द्यावें लागेल. वेतनाची पातळी वाढली अगर कच्च्या मालाच्या किंमती वाढल्या तर अन्नाच्या व पक्क्या मालाच्या किंमतीहि वाढतील. ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेंत कॉमनवेल्थ राष्ट्र-गटांतील देशांत होणाऱ्या व्यापाराला महत्त्वाचें स्थान आहे. हा व्यापार जर वाढत गेला तर ब्रिटनप्रमाणेंच राष्ट्र-गटांतील इतर देशांचाहि फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, ब्रिटनचा सोन्याचा व डॉलर्सचा सांठा असेरीस कॉमनवेल्थ राष्ट्र-गटांत सामील असलेल्या राष्ट्रांच्याच उपयोगीं पडतो.

## मुंबई राज्यांतील सहकारी साखर कारखाने

" शेतमालापैकीं प्रक्रिया करण्यासारखें पीक म्हणजे ऊंस हें आहे. या बाबतींत आपण यापूर्वींच १६ सहकारी साखर कारखाने स्थापन केले असून त्यांची २१,४७,३५० टन ऊंस गाळण्याची व २१,७८,५०० पोतीं साखर तयार करण्याची कुवत आहे. राज्याच्या अर्धविकसित भागांतील हा प्रत्येक कारखाना म्हणजे सामाजिक व आर्थिक विकासाचें केंद्र बनला असून आपल्या उत्पादक सभासदांना व कामगारांना उसापासून गूळ बनविण्याच्या धंद्यांत त्यांना मिळणाऱ्या प्राप्तीपेक्षा ३० ते ५० लाख रु. अधिक मिळवून देत आहे. वस्तुतः साखर काढण्यासाठी ऊंस मोठ्या प्रमाणावर वापरण्यांत येऊं लागल्यामुळें गुळाच्या किंमती वाढू लागल्या आहेत. यामुळें राज्यांतील, विशेषतः महाराष्ट्रांतील ऊंसउत्पादकांना, आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठीं ही एक प्रकारची सोनेरी किल्लीच मिळाली असल्याचें वाटूं लागलें आहे. यामुळें सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याची मागणी जोरदार होऊं लागली यांत कांहीं नवल नाहीं. सुदैवानें भारत सरकारनें या विभागांत साखर कारखाने उभारण्यास मान्यता दिली. पंजाब व उत्तर प्रदेशांतील उसामध्यें ९ ते १० टक्के शर्करांश असतो, तर महाराष्ट्रांतील उसामध्यें तो सुमारें १२ टक्के असतो. या वस्तुस्थितीचाहि या वेळीं विचार करण्यांत आला. याचाच परिणाम, आणखी ५ कारखान्यांच्या शिफारसी भारत सरकारकडे करण्यांत आल्या आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मराठवाडा, विदर्भ आणि महाराष्ट्र विभागांत आणखी साखर कारखाने काढण्यासंबंधी परवानगी मागण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. साखरेच्या उत्पादनाबरोबरच उद्योगधंद्यासाठीं लागणारें स्पिरिट व इतर पदार्थ सहकारी तत्त्वावर तयार करण्याबाबत विचार करतां येईल." डॉ. ए. यु. शेख,

सहकारी खात्याचे रजिस्ट्रार.

---

**मंगलोर बंदराचा विकास**—मंगलोर बंदराचा विकास करून त्याचें सर्व ऋतुंत उपयोगीं पडण्यासारखें बंदर बनविण्याचें भारत-सरकारनें ठरविलें आहे. मंगलोर बंदरापासून आंत असलेल्या प्रदेशाची भरभराट होण्यास त्यामुळें मदत होईल. बंदरापर्यंत पोंचणारा एक नवा रेल्वे मार्गहि बांधण्यांत यावयाचा आहे. दक्षिण भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें ह्या योजनेला महत्त्व आहे.

**कवि कालिदासाचें स्मारक**—अखिल भारतीय कालिदास-स्मारक समितीनें कवि कुलगुरु कालिदासाचें स्मारक उभारण्याचे ठरविलें आहे. एक वाचनालय आणि एक नाट्यगृह ह्यांच्या रूपानें स्मारक साकार होण्याचा संभव आहे. स्मारकासाठी भारतामधील सर्व राज्यांतील शिल्पज्ञांकडून व कलावंतांकडून सहकार्य घेण्यांत येणार आहे.

**चिनी मातीच्या भांड्याचा कारखाना**—काश्मीरच्या सरकारनें झेक तंत्रज्ञांच्या साह्यानें चिनी मातीचीं भांडीं तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ३५ लाख रुपये लागतील. कित्येक तज्ज्ञांनीं उपलब्ध असलेल्या कच्च्या मालाची पाहणी केली आहे. कारखान्याची यंत्रसामग्री झेकोस्लोव्हाकिआकडून आयात करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानची निर्यात**—पाकिस्तानमधील तागाच्या धंद्यानें चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत १·३५ लाख टन वजनाच्या तागाच्या वस्तू निर्यात करून १५·२१ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळविलें. तागाच्या वस्तूंना परदेशीं चांगली मागणी असल्यानें तागाचें उत्पादन वाढविण्यांत येणार आहे.

## साखर-कारखान्यांचा विकास

**( मध्यवर्ती उपअन्नमंत्री, श्री. अे. अेम. थॉमस )**

१९५८-५९ चा साखरेचा हंगाम संपत आहे. या वर्षांत साखरविषयक परिस्थिति कांहींशी बिकट होती. गतवर्षीची ३·३१ लाख टन शिल्लक साखर आणि यंदाचें अंदाजें १९·२१ लाख टन उत्पादन धरून देशांत या वर्षांत २२·५२ लाख टन साखर उपलब्ध झाली तर आपला या वस्तूचा खप २१ लाख टन होईल असा अंदाज आहे. त्यामुळें पुढील वर्षांत शिल्लकी साखरेचें प्रमाण अत्यल्पच असेल.

अशी परिस्थिति उद्‍भवण्यास खपाच्या प्रमाणाचा आपला चुकीचा अंदाज अथवा दोषपूर्ण नियोजन कारणीभूत नाहीं. उत्तर प्रदेश राज्यांत उंसाच्या लागवडीखालील क्षेत्रफळांत झालेली घट आणि उंसाचा साखरेऐवजीं गूळ व खांडसरी उत्पादनासाठीं केलेला वापर हें त्याचें एक कारण आहे. साखरेची उत्पादनशक्ति वाढविण्याचीहि योजना आपण आंखली होती. परंतु परकीय चलनाच्या तुटवड्यामुळें परवाना दिलेल्या कांहीं योजना पार पाडण्यास विलंब लागला. तथापि देशांतच साखर-धंद्यास लागणाऱ्या यंत्रसामग्रीचें उत्पादन सुरू करून ही अडचण दूर करण्यांत आली आहे. ही व्यवस्था झाल्यानें चालू व नंतर सुरू होणाऱ्या पंचवार्षिक योजनांतील परवानित अशी जादा उत्पादनशक्ति झपाट्यानें साध्य होण्यास मदत होईल; इतकेंच नव्हे तर अशा यंत्रसामग्रीच्या बाबतींत आपल्याला परदेशांवरहि अवलंबून राहावें लागणार नाहीं, ही एक समाधानकारक गोष्ट आहे.

नवीन साखरकारखान्यांचा विचार करतां आतांपर्यंत परवाना मिळालेल्या ५४ नव्या कारखान्यांपैकी सहकारी धर्तीवरील १९ कारखान्यांसुद्धां २७ कारखान्यांत १९५८-५९ च्या हंगामाअखेर उत्पादनास सुरुवात झाली आहे. या कारखान्यांची वार्षिक उत्पादनशक्ति ३·११ लाख टन आहे. आगामी हंगामांत म्हणजे १९५९-६० मध्यें एकूण ०·६१ लाख टन वार्षिक उत्पादनशक्ति असलेले आणखी ६ नवे कारखाने सुरू होण्याची अपेक्षा आहे. तसेंच चार सहकारी कारखान्यांस १९६०-६१ मध्यें उत्पादन सुरू करतां यावें म्हणून त्यांस लागणारी यंत्रसामग्री देशांत तयार करण्याचीहि व्यवस्था झाली आहे.

आतां विकास कार्यक्रमाचा विचार करतां परवाना मिळालेल्या ६९ कारखान्यांपैकी २८ चालू कारखान्यांनीं आपले विकास कार्यक्रम १९५८-५९ पर्यंत संपवून त्यांच्या उत्पादनशक्तींत १·४२ लाख टनांनीं वाढ केली आहे. १९५९-६० च्या हंगामांत आणखी ६ कारखान्यांचे विकास कार्यक्रम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. उरलेल्या कारखान्यांस लागणारी यंत्रसामग्री शक्य तितक्या कमी प्रमाणांत परदेशी सुट्या भागांचा वापर करून देशांतच तयार करण्याची सूचना देण्यांत आली आहे. या कारखान्यांचे विकास कार्यक्रम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर अथवा तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला पूर्ण व्हावेत.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील साखरउत्पादनाच्या लक्ष्यावर साखरविकासमंडळ विचार करीत असलें तरी साखरेच्या उत्पादनशक्तींत वाढ करण्यासाठी नव्या कारखान्यांस परवाने देण्याचा निर्णय अगोदरच घेण्यांत आला आहे. यामुळें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठरविण्यांत येणारें लक्ष्य झपाट्यानें साध्य होण्यास मदत होईल अशी मला आशा आहे.

हे नवीन कारखाने चांगल्या दर्जाच्या उसाचें उत्पादन करणाऱ्या विभागांतच सुरू करण्यांत यावेत. उत्तर भारताशीं तुलना करतां मुंबई, म्हैसूर व मद्रास या राज्यांतील उसाचा दर्जा व उत्पादन अधिक चांगलें आहे. आणि म्हणून या राज्यांत नवीन कारखाने सुरू करणें स्वागतार्ह ठरतें.

### उसाची लागवड करण्यासाठी नवें यंत्र

लखनौ येथील दि इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ शुगरकेन रिसर्च या संस्थेनें उसाची लागवड करण्यासाठी एक यंत्र तयार केलें आहे.

या नव्या यंत्राचा वापर केल्यास, उसाची लावणी करण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बरीच बचत होईल. या यंत्रामुळें आतां तीन मजूर व बैलांची एक जोडी लावून आठ तासांत दोन एकर विभागांत उसाची लावणी करतां येईल. सध्यांच्या पद्धतीनुसार तेवढ्याच वेळांत २½ एकर विभागांत लावणी करण्यास २४ मजूर व बैलांच्या दोन जोड्या लागतात.

या यंत्राचें व्यापारी प्रमाणावर उत्पादन करूं इच्छिणाऱ्यांनीं दि सेक्रेटरी, नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ, मंडी हाऊस, लिटन रोड, नवी दिल्ली-१ यांचेशीं पत्रव्यवहार करावा.

### उत्पन्न, खर्च आणि नफावांटणीचा तुलनात्मक तक्ता

१००१ कंपन्या; आंकडे लक्ष रुपयांचे

| | १९५५ | १९५६ | १९५७ |
|---|---|---|---|
| खर्च व नफावांटणी | | | |
| १. पक्का माल व यंत्रावरील माल, सुरुवातीचा स्टॉक | १९०,१२ | २०३,६७ | २५४,४८ |
| २. वापरलेला कच्चा माला व इतर उत्पादन व खर्च | ८२८,११ | ९५२,३५ | १०२६,७८ |
| ३. पगार व मजुरी | २३२,२८ | २५७,४७ | २७५,५१ |
| ४. कामगारांच्या सुखसोई | १७,७८ | २२,३४ | २४,५९ |
| ५. बुडित कर्जें | ६३ | ९२ | ३[illegible] |
| ६. एक्साइज ड्यूटी | ४९,७६ | ५८,८० | ८३,९[illegible] |
| ७. व्याज | १२,८० | १५,८६ | २३,१[illegible] |
| ८. मॅनेजिंग एजंटाचें वेतन | १४,६५ | ११ ८३ | ८,३९ |
| ९. इतर खर्च | १०२,६९ | १२८,७८ | १३८,८९ |
| १०, घसाऱ्याची तरतूद | ४२,९७ | ४७,४५ | ५३,४३ |
| ११. करापूर्वीचा नफा | ११७,५१ | १२८,७६ | १०४,४५ |
| १२. वजा कराची तरतूद | ५०,५४ | ५८ ८० | ५१,२६ |
| १३. करानंतरचा नफा | ६६,९७ | ६९,९६ | ५३,१९ |
| ( अ ) डिव्हिडंडस् | ३८,८० | ४२,३१ | ४१,९८ |
| ( ब ) न वांटलेला नफा | २८,१७ | २७,६५ | ११,२१ |
| १४ एकूण | १६०९,३० | १८२८,२३ | १९९३,८९ |
| उत्पन्न | | | |
| १५. विक्री/मुख्य उत्पन्न | १३९३,१९ | १५५८,७४ | १६९४,७८ |
| १६. इतर उत्पन्न | १४,६२ | १७,३१ | २०,२६ |
| १७. अखेरचा स्टॉक ( पक्का व यंत्रावरील माल ) | २०१,४० | २५२,४५ | २७८,८[illegible] |
| १८. एकूण | १६०९,३० | १८२८,२३ | १९९३,८[illegible] |

## नागरी विमानवाहतुकीची प्रगति

### ( जानेवारी-जून १९५९ )

एअर इंडिया इंटरनॅशनल या विमान कंपनीनें १९५८ मधील पहिल्या सहा महिन्यांतल्यापेक्षा १९५९ मधील पहिल्या सहा महिन्यांत आपल्या नित्याच्या मार्गावर ( शेड्यूल्ड सर्व्हिसेस ) अधिक फेऱ्या करून प्रवासी, माल व टपाल यांची अधिक प्रमाणांत वाहतूक केली.

एअर इंडिया इंटरनॅशनल विमानांनीं १९५९ च्या पहिल्या सहामाहींत नित्याच्या मार्गावर ६०,६१,६०७ किलोमीटर संचार करून, ४४,३३३ उतारू, ११,६९,०६२ किलोग्रॅम माल व ४,७३,००८ किलोग्रॅम टपाल यांची वाहतूक केली. १९५८ मधील याच कालावधींतील हेच आंकडे अनुक्रमें ५१,१८,१९७ किलोमीटर संचार, ३७,८३१ उतारू, ७,१०,८९७ किलोग्रॅम माल व ३,५४,१६४ किलोग्रॅम टपाल असे होते.

इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशनच्या विमानांनीं १९५९ च्या पहिल्या सहामाहींत नित्याच्या मार्गावर १,४०,२६,७४९ किलोमीटर संचार करून, ३,२७,६८५ प्रवासी, १,५८,८४,६७४ किलोग्रॅम माल व २९,२९,५२६ किलोग्रॅम टपाल यांची वाहतूक केली. १९५८ च्या याच कालावधींतील हेच आंकडे अनुक्रमें १,४०,८३,४७५ किलोमीटर, ३,१६,४३७ उतारू, २१७,०४,३४६ किलोग्रॅम माल व २५,८६,७८५ किलोग्रॅम टपाल असे होते.

### वाहतूकमार्ग

इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशनची दिल्ली-श्रीनगर मार्गावरील अखंड विमानवाहतूक १६ एप्रिल, १९५९ पासून पुन्हां सुरू झाली व १ मे पासून या मार्गावर दररोज विमानवाहतूक होऊं लागली. या कंपनीनें मुंबई-अहमदाबाद- राजकोट-भूज-कराची ( २ ) मुंबई-भावनगर व ( ३ ) मुंबई केशोद-पोरबंदर-राजकोट -जामनगर-भूज या मार्गावरील वाहतूक थांबवून त्याऐवजीं (१) मुंबई-राजकोट जामनगर-भूज (२) मुंबई-भावनगर-केशोद ( ३ ) मुंबई-भावनगर-पोरबंदर ( ४ ) मुंबई-भावनगर-पोरबंदर-मिथापूर आणि ( ५ ) मुंबई-अहमदाबाद या नव्या मार्गावर विमानवाहतूक चालू केली आहे.

### नॉन्-शेड्यूल्ड सर्व्हिसेस्

एअर इंडिया इंटरनॅशनल आणि इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशन व १४ सहायित विमान क्लब यांच्या जोडीस १९५९ च्या पहिल्या सहामाहीच्या अखेरीस सहा विमानवाहतूक कंपन्यांकडे नॉन्-शेड्यूल्ड वाहतुकीसाठी परवाने होते. इतर दोन कंपन्यांकडे उतारूंना मौजेदाखल विमानांत बसवून थोडा वेळ फिरवून आणण्याचे परवाने होते. या नॉन-शेड्यूल्ड मार्गावर या मुदतींत भारतीय कंपन्यांनीं ३६,४०,५२० किलोमीटर प्रवास करून ३८,२६५ उतारूंची व १,५१,२८,००८ किलोग्रॅम मालाची वाहतूक केली. १९५८ च्या पहिल्या सहामाहींतील हेच आंकडे अनुक्रमें ३९,९१,५७७ किलोमीटर प्रवास, ६५,२११ उतारू व १,८७,५९,०३४ किलोग्रॅम माल असे होते.

### विमानतळ

कांडला येथें बांधलेला नवीन विमानतळ १४ मार्च, १९५९ रोजीं वाहतुकीसाठी खुला करण्यांत आला. नागरी विमानवाहतूक खात्याच्या नियंत्रणाखालीं व देखभालीखालीं १९५९ च्या अखेरीस एकूण ८५ विमानतळ होते. सदर मुदतींत सांताक्रूझ विमानतळावरील पूर्व-पश्चिम धांवमार्गाबद्दलचें कांहीं काम आणि या विमानतळाजवळील कुर्ला टेकड्या क्र. १ व ४ कापून काढण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. या विमानतळावरील पूर्व-पश्चिम धांवमार्ग जेट विमानें चालविण्याच्या दृष्टीनें वाढविण्याबाबतच्या मुख्य योजनेंतील हें एक काम आहे.

### फ्लाइंग व ग्लायडिंग क्लब

भारतांत १४ सहाय्यित फ्लाईंग क्लब असून दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रास, नागपूर, पाटणा, जालंदर कॅम्प, भुवनेश्वर, जयपूर, बंगलूर, इंदूर, बेगमपेठ, गौहत्ती व लखनौ या ठिकाणीं त्यांच्या मुख्य कचेऱ्या आहेत. पुनर्विलोकनाच्या मुदतींत या क्लबांनीं एकूण ११५ 'ए' व ५ 'बी' वर्गीय वैमानिक शिकवून तयार केले व एकूण १३,६७० तास विमानोड्डाण केलें. अशा क्लबांतून विमानोड्डाणाचें मोफत शिक्षण घेतां यावें म्हणून भारत सरकारनें १९५९-६० मध्यें ६० शिष्यवृत्त्या मंजूर केल्या. ही शिष्यवृत्ति मिळणाऱ्यास ५० तास मोफत विमानोड्डाण करतां येतें. अलाहाबाद, बंगलूर, व पुणें येथील सरकारी ग्लाइडिंग केंद्रांनीं व दिल्ली ग्लाइडिंग क्लबनें याहि मुदतींत पूर्वीप्रमाणेंच ग्लायडर उड्डाणाची सोय केलेली होती. या क्लबांचें ७०४ तास ग्लायडर उड्डाण झालें व त्यांनीं २२ वैमानिकांना शिक्षण दिलें.

### अपघात

जानेवारी ते जून १९५९ या मुदतींत भारतांत १९ मोठे विमान-अपघात झाले. त्यांत १३ भारतीय विमानें, एक परदेशीय विमान व पांच ग्लायडरें सांपडलीं. पांच अपघात भीषण ठरून त्यांत ३३ जण प्राणास मुकले.

---

## कॉसमॉस बँकेचे नवे पदाधिकारी

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., च्या रविवार दिनांक १३ सप्टेंबर १९५९ रोजीं झालेल्या वार्षिक निवडणुकींत सन १९५९-६० सालाकरितां निवडून आलेलीं अधिकार मंडळें.

**सल्लागार मंडळ**—( १ ) मा. देहाडराय य. बा., अध्यक्ष. ( २ ) मा. टिळक वि. त्रिं., उपाध्यक्ष. ( ३ ) मा. भट चिं. वा. ( ४ ) मा. देशमुख गो. शं. ( ५ ) मा. कानगो श्री. अ.

**कार्यकारी मंडळ**—( १ ) मा. हर्डीकर वि. ल., कार्याध्यक्ष. ( २ ) मा. डॉ. धारपुरे न. का., उपकार्याध्यक्ष. ( ३ ) मा. भणगे गं. मो. ( ४ ) मा. गोगटे वा. ब. ( ५ ) मा. भोंडे र. पां. ( ६ ) मा. मो. अ. दा. ( ७ ) मा. गोखले ग. वि. ( ८ ) मा. देव द. ग. ( ९ ) मा. परांजपे वा. कृ. ( १० ) मा. कुलकर्णी मो. वि. ( ११ ) मा. दिवाकर शं. वि.

**स्थानिक आयव्यय निरीक्षक**—( १ ) मा. देशपांडे रा. कृ. ( २ ) मा. साठे व. का.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें छावणी (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारली जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारली जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. वा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८१.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षें | २¾ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंपरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. म. धंडुके

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

| | |
|---|---|
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ५३ लक्ष |
| एकूण ठेवी : | रु. १२ कोटी |
| खेळतें भांडवल : | रु. २४ कोटींचे वर |

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.